MHST010023742019

दाखल तारीख – १३.०६.२०१९
नोंदणी तारीख – २५.०७.२०१९
निकाल तारीख – १७.०८.२०२६
कालावधी – वर्ष – महिने – दिवस
०७ – ०२ – ०४

मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, सातारा
(अध्यक्ष अरविंद शं. वाघमारे)
मोटार अपघात नुकसान भरपाई मागणी अर्ज क्र. २०८/२०१९

निशाणी क्र.५२.

१. **श्रीमती अर्चना विठ्ठल मोहिते,**
वय वर्षे– ३०, धंदा– घरकाम.
२. **अनिकेत विठ्ठल मोहिते,**
वय वर्षे– ११, धंदा–शिक्षण.
३. **वेदिका विठ्ठल मोहिते,**
वय – ९ वर्षे, धंदा– शिक्षण.
४. **श्रीमती सकुबाई धोंडीबा मोहिते,**
वय – ६५ वर्षे, धंदा– काही नाही.
सर्व रा. डावरी, ता. पाटण, जि.सातारा.

... **अर्जदार**

विरुध्द

१. **श्री. विलास लक्ष्मण मोहिते,**
वय– सज्ञान, धंदा–व्यापार,
रा. ओम शिवशक्ती चाळ क्र.६,
महाराष्ट्रनगर नं.३, मानखुर्द,मुंबई.
२. **विभागीय व्यवस्थापक,**
बजाज अलियांझ जनरल इन्शुरन्स कं. लि.
पत्ता– जीई प्लाझा, एअरपोर्ट रोड,
येरवडा, पुणे.

... **सामनेवाले**

अर्जदारांतर्फे वकील– श्री. एस.डी. भोसले.
सामनेवाला क्र.१ तर्फे वकील – श्री. एस.आर. महागावकर.
सामनेवाला क्र.२ तर्फे वकील– श्री. एस.बी. गोवेकर.

न्यायनिर्णय
(जाहीर दिनांक १७ ऑगस्ट २०२६)

प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी मोटार वाहन कायदा १९९४ चे कलम १६६ अन्वये

मयत विठ्ठल धोंडिबा मोहिते, वय ३५ वर्षे यांच्या अपघाती मृत्यूबद्दल रुपये ३०,००,०००/– नुकसानभरपाई मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ मयताची पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ मुले आणि अर्जदार क्र.४ ही मयताची आई आहे.

०२. सामनेवाला क्र.१ हे अपघातग्रस्त मोटरसायकल क्र. एम.एच.०३सी.डब्ल्यू.०९५९ चे मालक व सामनेवाला क्र.२ ही विमा कंपनी आहे. (येथून पुढे सोईसाठी या वाहनाचा उल्लेख ''सदर मोटरसायकल'' असा करण्यात येईल.)

०३. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, दिनांक १३.०४.२०१९ रोजी सायंकाळी ०५.३० च्या सुमारास मयत विठ्ठल हे सुधिर विलास मोहिते चालवित असलेल्या बजाज पल्सर मोटरसायकल क्र. एम.एच.०३सी.डब्ल्यू.०९५९ वर पाठिमागे बसून प्रवास करत होते. मौजे बोपेगाव, ता.वाई, जि.सातारा गावच्या हद्दीत पुणे–सातारा रस्त्यावर सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीच्या मोटरसायकल चालकाने मोटरसायकल भरधाव वेगात, हयगयीने, निष्काळजीपणे चालवली व मोटरसायकल नियंत्रीत न झाल्याने ती घसरुन बाजूच्या संरक्षक कठड्याला धडकून अपघात झाला. सदर अपघातात विठ्ठल हे गंभीर जखमी होऊन मयत झाले. अशाप्रकारे अपघात हा सदर मोटरसायकल चालकाने निष्काळजीपणे वाहन चालविल्यामुळे झालेला आहे.

०४. अपघातावेळी मयत विठ्ठल यांचे वय ३५ वर्षे होते. ते महाराज आर्टस, मुंबई येथे सन २०१० पासून सिक्युरिटी गार्ड म्हणून नोकरीस होते. त्यांना दरमहा रुपये १२,५००/– इतका पगार मिळत होता. तसेच त्यांना गावी पाच एकर बागायती शेती होती व शेतीतून त्यांना दरसाल रुपये २,००,०००/–

---3

इतके उत्पन्न मिळत होते. अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत विठ्ठल यांच्या उत्पन्नावर अवलंबून होते. या सर्व कारणांसाठी त्यांनी रुपये ३०,००,०००/– नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

०५. सामनेवाला क्र.१ यांनी निशाणी १४ लगत कैफियत दाखल करुन अर्जदारांची कथने नाकारली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, अपघातावेळी त्यांचा मुलगा सदर मोटरसायकल सावकाश व रस्त्याच्या डाव्या बाजुने चालवित असताना सदर मोटरसायकल घसरल्यामुळे अपघात झाला असून अपघातात मोटरसायकल चालकाची चुक नव्हती. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, अपघातावेळी सदर मोटरसायकल सामनेवाला क्र.२ या विमा कंपनीकडे विमाकृत होती. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याची संपूर्ण जबाबदारी सामनेवाला क्र.२ यांची आहे. त्यांनी मयताचे वय, व्यवसाय व उत्पन्न नाकारले आहे. या आणि इतर मुद्यांवर अर्जदारांचा दावा त्यांच्याविरुद्ध फेटाळण्यात यावा अशी सामनेवाला क्र.१ यांनी विनंती केली आहे.

०६. सामनेवाला क्र.२ यांनी निशाणी १६ लगत कैफियत दाखल करुन अर्जदारांची कथने नाकारली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, अपघातावेळी मयत विठ्ठल हे मोटरसायकल चालवित होते व त्यांच्या हलगर्जीपणामुळे अपघात झाला. विकल्पेकरुन त्यांनी असे कथन केले आहे की, अपघातावेळी सदर मोटरसायकल चालकाकडे वाहन चालविणेचा वैध परवाना नव्हता त्यामुळे सामनेवाला क्र.१ यांनी विमापत्रातील अटी व शर्तींचा भंग केला आहे. अर्जदारांनी सदर मोटरसायकल चालकास प्रस्तुतकामी पक्षकार केले नसल्याने अर्जास आवश्यक पक्षकार सामिल नाहीत या तत्वाची बाधा येते. सामनेवाला क्र.२ यांनी मयत विठ्ठल यांचे वय, व्यवसाय, त्यांचे दरमहा असलेले उत्पन्न, अर्जदारांचे मयतावर असलेले अवलंबित्व इत्यादि गोष्टी अमान्य केलेल्या

आहेत व अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नाहीत असे नमुद करुन त्यांच्याविरुध्द क्लेम अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०७. माझे पूर्वाधिकारी यांनी अर्जदार व सामनेवाले यांच्या कथना आधारे निशाणी १५ अन्वये मुद्दे निश्चित केले आहेत. त्या वाद प्रश्नांवर त्यालगत माझे निष्कर्ष आणि त्यांची कारणमीमांसा खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

अ.क्र.	मुद्दे.	निष्कर्ष
१	मोटरसायकल क्र. एम.एच.०३सी.डब्ल्यू.०९५९ च्या चालकाने भरधाव वेगात व निष्काळजीपणे मोटरसायकल चालवल्याने झालेल्या अपघातात विठ्ठल धोंडिबा मोहिते यांचा मृत्यू झाला, हे अर्जदार सिध्द करतात काय ?	होय.
२	अर्जदार हे मागितलेल्या नुकसान भरपाईची रक्कम मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ?	होय. अंतिम आदेशाप्रमाणे.
३	नुकसान भरपाई देण्यास कोण जबाबदार आहे ?	सामनेवाला क्र.१ व २.
४	आदेश काय ?	अंतिम आदेशाप्रमाणे.

कारणमीमांसा

०८. अर्जात केलेली विधाने सिद्ध करण्यासाठी अर्जदार यांच्यातर्फे खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर करणेत आला.

१	प्रथम वर्दि अहवाल.	नि. १८
२	घटनास्थळ पंचनामा.	नि. १९
३	मरणोत्तर पंचनामा.	नि. २०

४	शवविच्छेदन अहवाल.	नि. २१
५	आर.सी. बुक.	नि. २२
६	विमापत्र.	नि. २३
७	वाहन चालविण्याचा परवाना.	नि. २४
८	७/१२ व ८अ उतारा.	नि. २५ ते ३४
९	पगार पत्रके. माहे डिसेंबर–१८ ते एप्रिल–२०१९	नि. ४१ ते ४५

०९. अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र.१ अर्चना विठ्ठल मोहिते यांनी निशाणी १७ अन्वये पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे. तसेच मयत विठ्ठल यांच्या उत्पन्नाच्या शाबीतीसाठी साक्षीदार क्र.२ अधिक रामचंद्र मोहिते यांचा जबाब निशाणी ३७ अन्वये नोंदविला आहे.

१०. अर्जदार यांनी सादर केलेला पुरावा खोडून काढण्याकरीता सामनेवाला यांनी कोणताही साक्षीदार तपासला नाही.

११. अर्जदारांचे विधीज्ञ श्री. एस.डी. भोसले आणि सामनेवाला क्र.२ विधीज्ञ श्री.एस.बी. गोवेकर यांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवाला क्र.१ तर्फे युक्तीवाद करणेत आला नाही.

१२. अर्जदारांच्या विधीज्ञांनी युक्तीवादादरम्यान सादर केलेल्या खालील न्यायनिर्णयांचे अवलोकन केले.

1) Shailaja Vs. Pavan B. Udupudi, LAWS(SC)–2025–1–183.

2) Prabhavathi Vs. Managing Director, Bangalore Metropolitan,Transport Corporation., LAWS(SC)2025–2–114.

3) Usha Goyal Vs. Tehal Singh & Ors., FAO–5744–2012.

4) Savitriben wd/o Sardarbhai Hanabhai Vs. Dineshbhai Mangabhai Solanki, R/First Appeal No. 1791/2013.

5) Sunita Vs. Vinod Singh, LAWS(SC)-2025-3-49.

मुद्दा क्रमांक १ ते ४ –

१३. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रीतपणे चर्चेला घेतले आहेत.

१४. अर्जदार क्र.१ अर्चना विठ्ठल मोहिते यांनी स्वतःला शपथेवर निशाणी १७ अन्वये तपासून तोंडी पुरावा दिला आहे. त्यांच्या अर्जातील कथने व त्यांचा तोंडी पुरावा याचे एकत्रीतरित्या वाचन करता असे दिसून येते की, त्यांचे पती मयत विठ्ठल हे सदर मोटरसायकलवर पाठिमागे बसून प्रवास करत होते. मौजे बोपेगाव, ता.वाई, जि.सातारा गावच्या हद्दीत पुणे-सातारा रस्त्यावर सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीची मोटरसायकल चालकाने भरधाव वेगात, हयगयीने, निष्काळजीपणे चालवली व मोटरसायकल नियंत्रीत न झाल्याने ती घसरुन बाजूच्या संरक्षक कठड्याला धडकून अपघात झाला. सदर अपघातात विठ्ठल हे गंभीर जखमी होऊन मयत झाले.

१५. सदरचा पुरावा हा सामनेवाला क्र.२ यांनी उलटतपासाद्वारे आव्हानीत केला आहे. या साक्षीदाराने अपघात स्वतः पाहिला नसल्याचे कबुल केले आहे. तसेच मोटरसायकल चालकाकडे वाहन चालविण्याचा परवाना होता व तो हजर करण्यास तयार असल्याचे कथन केले.

१६. सदर अपघाताची खबर ज्ञानेश्वर धोंडीबा मोहिते यांनी दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरुन पोलीसांनी सदर मोटरसायकल चालकाविरुध्द गुन्हा दाखल केल्याचे दिसून येत आहे. तसेच पोलीसांनी दि. १३,४,२०१९ रोजी

अपघातस्थळास भेट देऊन निशाणी १९ कडील पंचनामा केलेला दिसून येत आहे.

१७. सदर अपघात हा मयत विठ्ठल व सदर मोटरसायकल चालक यांच्या माहितीतील होता. सबब, सदर मोटरसायकल चालक हे सुद्धा सदर अपघाताचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. परंतु सदर मोटरसायकल चालक यांना सामनेवाला क्र.२ यांनी साक्षीदार म्हणून तपासले नाही.

१८. गुन्ह्याची पहिली वर्दि (निशाणी १८) मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर अपघातामध्ये मयत विठ्ठल यांच्या डोक्यास गंभीर जखमा होऊन मृत्यू झाला आहे. तसेच मरणोत्तर पंचनामा (नि.२०) आणि शवविच्छेदन अहवाल (नि.२१) मध्ये अपघातात मयत विठ्ठल यांच्या डोक्यास मार लागून त्यांचा मृत्यू झाल्याचे दिसून येत आहे. निशाणी १८ कडील प्रथम वर्दि अहवालाचे अवलोकन करता मोटरसायकलचे चालक सुधीर विलास मोहिते हे असल्याने त्यांच्यावर अपघाताचा गुन्हा दाखल झाल्याचे दिसून येते. वर चर्चा केल्याप्रमाणे सदर अपघात हा सदर मोटरसायकल चालकाच्या चुकीने झाल्याचे सिद्ध होते. सबब, सामनेवाला क्र.२ यांच्या विधीज्ञांनी युक्तीवादात कथन केल्याप्रमाणे प्रस्तुतचा अपघात सदर मोटरसायकल चालकाच्या चुकीने झाला नसून मयत विठ्ठल यांच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे सिद्ध होत नाही.

१९. आता असा प्रश्न उपस्थित होतो की, अर्जदार यांनी मागितलेली नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत काय? असल्यास किती व कोणाकडून? अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे मयत विठ्ठल यांचे वय अपघातावेळी ३५ वर्षे होते. हे दाखविण्यासाठी त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. अर्जदारांच्या विधीज्ञांनी वर नमुद माननीय सर्वोच्च न्यायालय यांचेकडील ***सुनिता***

वि।। विनोद सिंग हा न्यायनिर्णय सादर करुन वयाबाबतचा पुरावा नसल्यास शवविच्छेदन अहवालात नमुद असलेले वय नुकसान भरपाईच्या गणणेसाठी ग्राह्य धरावे असे कथन केले. या मुद्यावर सामनेवाला क्र.२ च्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदारांनी उलटतपासादरम्यान मयत विठ्ठल यांच्या वयाबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करण्याचे कबुल करुनही तसा पुरावा सादर केला नाही. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, अपघातावेळी मयत विठ्ठल याचे वय जास्त म्हणजेच ३८ ते ३९ वर्षे असल्याने अर्जदारांनी मयत विठ्ठल यांच्या वयाचा पुरावा प्रस्तुतकामी दाखल केला नाही. निशाणी २० कडील शवाचा पंचनामा आणि निशाणी २१ कडील शवविच्छेदन अहवालात मयत विठ्ठल यांचे वय ३५ वर्षे इतके नमुद आहे. सदरप्रमाणे नमुद असलेले वय हे नातेवाईकांच्या सांगण्याप्रमाणे पोलीसांनी अथवा डॉक्टरांनी नमुद करणे अभिप्रेत आहे. त्यामुळे अपघातावेळी त्यांचे वय ३५ वर्षे होते असे ठामपणे म्हणता येणार नाही. प्रस्तुतकामी अर्जदारांनी उलटतपासावेळी मयत विठ्ठल यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाल्याचे कबुल केले आहे. येथे हे नमुद करणे आवश्यक वाटते की, मयत विठ्ठल यांच्या वयाचा पुरावा म्हणजेच त्यांचा शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र यापैकी कोणतेही कागदपत्र अर्जदार सहजतेने दाखल करु शकले असते. परंतु अर्जदारांनी तसे कोणतेही कागदपत्र प्रस्तुतकामी सादर केले नाहीत. त्यामुळे अपघातावेळी मयत विठ्ठल यांचे वय ३८ वर्षे होते असे गृहित धरणेत येते. माननीय सर्वोच्च न्यायालयाचे ***सरला वर्मा वि।। दिल्ली ट्रान्स्पोर्ट कं. व इतर, २००९(२) टीएसी ६७७*** या न्यायनिर्णयातील निरिक्षणानुसार वयोगट ३६ ते ४० साठी "१५'' हा गुणांक या प्रकरणामध्ये लागू होतो.

२०. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, मयत विठ्ठल हे महाराज आर्टस, मुंबई येथे १० वर्षांपासून सिक्युरिटी गार्ड म्हणून नोकरीस होते. त्यांना दरमहा रुपये १२,५००/– इतका पगार मिळत होता. ही बाब सिध्द करण्यासाठी

त्यांनी निशाणी ३७ अन्वये श्री.अधिक रामचंद्र मोहिते यांचा जबाब नोंदविला आहे. त्यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, मयत विठ्ठल धोंडिबा मोहिते हे त्यांच्याकडे सिक्युरिटी गार्ड म्हणून नोकरीस होते. ते त्यांना दरमहा रुपये १२,५००/– इतका पगार देत होते. या कथनांच्या पुष्ठ्यर्थ त्यांनी निशाणी ३९ अन्वये पगाराचे प्रमाणपत्र, निशाणी ४१ ते ४५ अन्वये मयत विठ्ठल यांची पगार पत्रके आणि निशाणी ४० अन्वये व्यवसाय नोंदणी दाखला अशी कागदपत्रे सादर केली आहेत. सामनेवाला क्र.१ यांनी या साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही. सामनेवाला क्र.२ यांच्या विधिज्ञांतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासात त्यांनी ते मयत विठ्ठल हे त्यांच्याकडे कामाला होते व त्यांची नेमणूक केल्याचे कागदपत्र त्यांच्याकडे नसल्याचे मान्य केले आहे. त्यांनी निशाणी ४१ ते ४५ कडील पगाराच्या पावत्या खोट्या तयार केल्याचे नाकारले आहे. ते कर्मचाऱ्यांच्या पगाराची रक्कम खात्यावर जमा करत असल्याचे त्यांनी कबुल केले. परंतु मयत विठ्ठल यांच्या खात्यावर पगार जमा केल्याचा तपशिल हजर करण्यास तयार असल्याचे मान्य करुनही तसा तपशिल प्रस्तुतकामी दाखल करण्यात आला नाही. तसेच त्यांनी पुढे उलटतपासात मयत विठ्ठल हे त्यांच्याकडे कामाला होते व त्यांची नेमणूक केल्याचे दाखविणारे कागदपत्र त्यांच्याकडे नसल्याचे त्यांनी कबुल केले आहे. या सर्व बाबी विचारात घेता मयत विठ्ठल हे उदरनिर्वाहासाठी काही ना काही कामधंदा करत असणार. सबब, नुकसान भरपाईच्या गणणेकरीता त्यांचे दरमहाचे काल्पनिक उत्पन्न रुपये १०,०००/– इतके गृहित धरणेत येते.

२१. मयत विठ्ठल यांना शेतीपासून उत्पन्न मिळत होते ही बाब शाबीत करण्यासाठी अर्जदारांनी निशाणी २५ ते ३४ अन्वये ७/१२ व ८अ उतारे दाखल केले आहेत. अर्जदाराच्या विधीज्ञांनी युक्तीवादादरम्यान असे कथन केले की, शेतीपासूनच्या उत्पन्नाच्या नुकसान भरपाईच्या गणणेसाठी व्यवस्थापकीय खर्चासाठी प्रति एकरी रुपये ३०००/– प्रमाणे रुपये १५,०००/– मंजुर करणेत

यावेत. सामनेवाला क्र.२ च्या विधीज्ञांनी या मुद्यावर युक्तीवादादरम्यान अर्जदाराच्या उलटतपासाकडे लक्ष वेधले. अर्जदार यांनी निशाणी १७ कडील उलटतपासात मयत विठ्ठल हे मुंबई येथे नोकरीस असल्याचे कबुल केले आहे. तसेच अर्जदारांनी दाखल केलेले ७/१२ उतारे हे त्यांच्या सासऱ्यांच्या नावचे असून वारस म्हणून मयत विठ्ठल यांचे नाव ७/१२ सदरी लागले नसल्याचेही कबुल केले आहे. यावरुन मयत विठ्ठल यांना शेती होती, ते शेती करत होते व त्यापासून त्यांना उत्पन्न मिळत होते असे म्हणता येणार नाही. अशापरिस्थितीत अर्जदारांच्या विधीज्ञांनी दाखल केलेले वर नमुदप्रमाणे ***Shailaja Vs. Pavan B. Udupudi*** आणि ***Usha Goyal Vs. Tehal Singh & Ors.*** या न्यायनिर्णयातील आणि प्रस्तुत प्रकरणातील परिस्थिती आणि तथ्ये वेगळी असल्याने ते न्यायनिर्णय प्रस्तुतकामी लागू होत नाहीत. या सर्व बाबी विचारात घेता मयत विठ्ठल हे शेती करत होते व त्यांना शेतीपासून उत्पन्न मिळत होते ही बाब शाबीत होत नाही.

२२. अर्जदार क्र.१ या पत्नी, अर्जदार २ व ३ ही मुले आणि अर्जदार क्र.४ ही आई या नात्याने मयत विठ्ठल यांच्यावर अवलंबून असल्याचे दिसून येते. त्यामुळे मयताच्या वैयक्तीक खर्चाकरीता १/४ रक्कम वजा करणे योग्य ठरते. प्रस्तुत प्रकरणी मयत विठ्ठल हे नोकरी करत असल्याने त्यांचे नोकरीपासूनचे काल्पनिक उत्पन्न विचारात घेणेत आले आहे. सबब, वर चर्चा केल्याप्रमाणे अपघात समयी मयत विठ्ठल यांचे वय ३९ वर्षे असल्याने ***नॅशनल इंशुरंस कं.लि. विरुध्द प्रणय सेठी, २०१७ ए.सी.जे.२७००*** या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालपत्रातील निर्देशाप्रमाणे मयताचे भविष्यातील उत्पन्नाची वाढ ४० टक्के विचारात घ्यावी लागेल. तसेच मयताचे वयानुसार १५ चा गुणांक लागू होईल. या विवेचनाच्या आधारे नुकसान भरपाईची गणना खालीलप्रमाणे केली आहे.

१.	मयताचे वार्षीक उत्पन्न १२ x १०,०००/–	रुपये १,२०,०००/–
२.	भविष्यातील उत्पन्नाची वाढ ४० टक्के. (रुपये १,२०,०००+ ४८,०००)	रुपये १,६८,०००/–
३.	मयतावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या ४ असल्यामुळे मयताचा वैयक्तीक खर्च १/४ वजा करता मिळणारे उत्पन्न, वजा करता अर्जदाराची अवलंबीत्वाची रक्कम.	रुपये १,६८,०००/– वजा रु. ४२,०००/– (रु. १,२६,०००/–)
४.	मयताचे वयाचा विचार करता उत्पन्नाची हानी निश्चित करण्यासाठी गुणांक १५ ने गुणून उत्पन्नाची अवलंबित्वाची रक्कम. (रुपये १,२६,०००/–x १५)	रु. १८,९०,०००/–
५.	लॉस ऑफ कंसोरटिअम (सहवासाचे नुकसान) (दि.३१.१०.२०१७ पासून रुपये ४०,०००/– वर दर ३ वर्षांनी १० टक्के वाढीसह येणारी र.रु. ४८,००० x ४.)	रुपये १,९२,०००/–
६.	लॉस ऑफ इस्टेट (संपत्तीचे नुकसान) व अंत्यविधी या करीता खर्च एकत्रीतपणे रुपये ३०,०००/–. (दि.३१.१०.२०१७ पासून रुपये ३०,०००/– वर दर ३ वर्षांनी १० टक्के वाढीसह येणारी र.रु. ३६,०००/–)	रुपये ३६,०००/–
	नुकसान भरपाईची अंतिम रक्कम. (अ.क्र.४ ते ६)	**रु. २१,१८,०००/–**

२३. निशाणी ४० कडील विमा पॉलीसीचे अवलोकन करता अपघात समयी सदर मोटरसायकल सामनेवाला क्र.३ या विमा कंपनीकडे दि. १०.०४.२०१९ ते ०९.०४.२०२० या कालावधीकरीता विमाकृत होती. प्रस्तुतचा अपघात हा दि. १३.०४.२०१९ रोजी झाला असून त्या दिवशी विमा पॉलीसी वैध असल्याने अर्जदारांना नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी विमा कंपनीवरही येते. अर्जदार क्र.१ ते ४ यांना मयत विठ्ठल धोंडिबा मोहिते यांच्या

अपघाती मृत्यूबाबत वरीलप्रमाणे विविध तपशिलांसाठी नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी सामनेवाला क्र.१ व २ यांची वैयक्तीक व संयुक्तिक आहे. अर्जदार हे वरील रकमेवर अर्ज दाखल तारखेपासून द.सा.द.शे. ७ टक्के दराने व्याज मिळण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर "होय" असे नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्जदार यांचा मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज खर्चासह अंशतः मंजुर करणेत येतो.

२. सामनेवाला क्र.१ व २ हे वैयक्तीक व संयुक्तीकरित्या अर्जदार क्र.१ ते ४ यांना अंतरीम नुकसानभरपाईच्या रकमेसह एकूण नुकसान भरपाई रक्कम रुपये २१,१८,०००/- (रक्कम रुपये एकवीस लाख अठरा हजार फक्त) व त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम वसुल होईपर्यंत द.सा.द.शे. ७ टक्के व्याज दराने देण्यास बांधील आहेत.

३. सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदारांना देण्याकरीता वरील रक्कम वाहन अपघात दावा न्यायाधिकरण यांचे बँक खाते क्रमांक ४०८२७५२६३३३, IFSC कोड क्र. SBIN-0010713 मध्ये जमा करावी.

४. नुकसान भरपाईच्या व्याजासह येणाऱ्या एकूण रकमेपैकी अर्जदार क्र.१ यांना ४०%, अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी २५% आणि अर्जदार क्र.४ यांना १०% रक्कम देण्यात यावी.

५. अर्जदार क्र.१ यांचे हिश्श्यास येणाऱ्या रकमे पैकी ५० टक्के रक्कम त्यांच्या पसंतीच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत तीन वर्षांच्या मुदत ठेवीने ठेवणेत

यावी. मात्र ठेवीवरील मासिक अथवा त्रैमासिक व्याज त्यांच्या इच्छेनुसार घेण्याची त्यांना मुभा राहील. अर्जदार क्र.१ यांच्या हिश्श्याची उर्वरीत रक्कम त्यांच्या बँक खात्यात ऑन लाईन पद्धतीने वर्ग करण्यात यावी.

६. अर्जदार क्र.२ व ३ यांच्या हिश्श्यास व्याजासह येणारी संपूर्ण रक्कम अनुक्रमे अर्जदार क्र.१ यांच्या पसंतीच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत अर्जदार क्र.२ व ३ यांच्या नावे ते सज्ञान होईपर्यंत मुदत ठेवीने ठेवणेत यावी. मात्र ठेवीवरील मासिक अथवा त्रैमासिक व्याज इच्छेनुसार घेण्याची मुभा अर्जदार क्र.१ यांना राहील. अर्जदार क्र.२ व ३ हे अज्ञान असल्याने अ.पा.क. म्हणून अर्जदार क्र.१ अर्चना विठ्ठल मोहिते यांचे नांव लावण्यात यावे.

७. अर्जदार क्र.४ यांच्या हिश्श्यास व्याजासह येणारी संपूर्ण रक्कम त्यांच्या बँक खात्यात ऑन लाईन पध्दतीने वर्ग करण्यात यावी.

८. अर्जदार क्र.१ ते ४ यांनी नुकसान भरपाईची रक्कम वर्ग करण्यासाठी त्यांचा बचत खाते क्रमांक, पॅन क्रमांक आणि आधार क्रमांक सादर करावा.

९. मुदतीपूर्वी सदर रक्कम या न्यायाधिकरणाचे पूर्व परवानगीशिवाय परत करणेत येवू नये.

१०. अर्जदार यांनी अदा केलेले न्यायीक शुल्क कमी असल्यास, कमी असलेले न्यायीक शुल्क अर्जदार यांनी १५ दिवसांत अदा केल्यानंतर आदेश अंमलात येईल. न्यायीक शुल्क देण्यास विलंब झाल्यास आदेशाच्या तारखेपासून न्यायीक शुल्काची रक्कम अदा करे पर्यंतच्या कालावधीत नुकसान भरपाईच्या रकमेवर व्याज मिळण्यास अर्जदार पात्र राहणार नाहीत.

११. येणेप्रमाणे अंतिम हुकुमनामा करणेत यावा.

ARVIND WAGHMARE

Digitally signed by ARVIND WAGHMARE
Date: 2026.08.17 17:16:25 +0530

(अरविंद शं. वाघमारे)

दि. १७ ऑगस्ट २०२६ अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
सातारा.